आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
७ ऑक्टोबर २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

- देशाच्या विकासाच्या मार्गात नक्षली कारवाया हा मोठा अडथळा असून विकासाची फळं जर तळागाळापर्यंत पोहोचवायची असली तर नक्षली कारवायांना पायबंद घालणं आवश्यक असल्याचं केंद्रीय गृहमंत्र्यांचं प्रतिपादन
- भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची द्वैमासिक आढावा बैठक आज मुंबईत सुरू
- मालदीव आणि भारतादरम्यान प्रतिनिधीमंडळ स्तरावर चर्चा / उभय राष्ट्रांदरम्यान अनेक महत्त्वाच्या करारांवर स्वाक्षऱ्या

**आणि**

- मध्य प्रदेशात भोपाळ इथून अठराशे कोटीं रुपयांपेक्षा अधिक किमतीचे अमली पदार्थ जप्त

<><><><><>

देशाच्या विकासाच्या मार्गात नक्षली कारवाया हा मोठा अडथळा असून विकासाची फळं जर तळागाळापर्यंत पोहोचवायची असली तर नक्षली कारवायांना पायबंद घालणं आवश्यक असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. देशातल्या नक्षलप्रभावित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक आज अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्लीत होत आहे. महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, बिहार, छत्तीसगड, झारखंड, तेलंगण, ओडीशा आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री बैठकीत उपस्थित आहेत. याशिवाय या राज्यांमधल्या विकासाशी संबंधित मंत्रालयांचे मंत्री, राष्ट्रीय सुरक्षा उपसल्लागार, सुरक्षा दलाचे अधिकारीदेखील उपस्थित राहणार

आहेत. केंद्र सरकारच्या प्रयत्नांमुळे या राज्यांमधल्या  नक्षलवादी कारवायांमधे 72 टक्के घट झाली असून त्यांचा बीमोड करण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं गृहमंत्रालयानं म्हटलं आहे. सरकारनं या भागात दळणवळण आणि संपर्क व्यवस्थेच्या विकासासाठी अनेक उपाययोजना केल्याचंही मंत्रालयानं नमूद केलं आहे.  या भागात १४ हजार किलोमीटर लांबीचे रस्ते बांधण्यात आले तसंच सहा हजार मोबाईल टॉवर्स उभारण्यात आले. चालू वर्षात २०२ नक्षली अतिरेकी सुरक्षा दलांबरोबरच्या चकमकींमधे मारले गेले तर ८१२ अतिरेक्यांना अटक झाली. या वर्षात ८१२ नक्षल्यांनी शरणागती पत्करली असून नक्षलप्रभावित जिल्ह्यांची संख्या आता ३८ वर  उतरली आहे. अशी माहिती गृहमंत्रालयाने दिली आहे.

<><><><><>

झारखंडमध्ये एनआरसी लागू करणार असल्याचं केंद्रीय कृषी मंत्री शिवराज चौहान यांनी म्हटलं आहे. झारखंडच्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज ते दिल्लीत वार्ताहरांशी बोलत होते. झारखंड विधानसभा निवडणुकीसाठीचा जाहीरनामा लवकरच जाहीर केला जाईल असं त्यांनी यावेळी सांगितलं. बांगलादेशी घुसखोरांमुळे झारखंडची लोकसंख्या समीकरणं बदलत असल्याचं ते म्हणाले. व्होट बँकेसाठी हेमंत सोरेन आणि आघाडी सरकार घुसखोरांना संरक्षण देत असल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला.

<><><><><>

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची द्वैमासिक आढावा बैठक आज मुंबईत सुरू झाली. अन्नधान्याची दरवाढ नियंत्रणात ठेवून आर्थिक विकासाला

चालना देणं हा पतधोरण समितीसाठी चर्चेचा प्रमुख मुद्दा असेल, असं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. परवा येत्या बुधवारी रिझर्व्ह बँकेच्या चलन आणि पतविषयक धोरणाचा द्वैमासिक आढावा जाहीर होणार आहे.

<><><><><>

भारत आणि संयुक्त अरब अमिराती यांच्यात झालेला द्विपक्षीय गुंतवणूक करार ३१ ऑगस्टपासून लागू झाल्याची माहिती अर्थ मंत्रालयाने दिली आहे. या वर्षी १३ फेब्रुवारी महिन्यात अबुधाबी इथे या करारावर स्वाक्षरी झाली होती. यापूर्वी भारत आणि यूएईमध्ये झालेला गुंतवणूक, संरक्षण आणि प्रोत्साहन करार २०१३मध्ये झाला होता, तो यावर्षी १२ सप्टेंबर रोजी कालबाह्य झाला आहे. भारतात येणाऱ्या एकूण परकीय गुंतवणुकीत संयुक्त अरब अमिरातीचा वाटा तीन टक्के इतका आहे. एप्रिल २००० पासून ते जून २०१४पर्यंतची गुंतवणूक १९ अब्ज अमेरिकी डॉलर्स इतकी आहे.

<><><><><>

जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीचे निकाल उद्या जाहीर होणार आहेत. उद्या सकाळपासून केंद्रशासीत प्रदेशातल्या वीस मतमोजणी केंद्रावर कडक सुरक्षा व्यवस्थेत मतमोजणीला सुरुवात होईल. मतमोजणी केंद्र उभारलेल्या सर्व जिल्हा मुख्यालयांमध्ये आवश्यक व्यवस्था करण्यात आली आहे. सर्व मतमोजणी केंद्रावर केंद्रीय सशस्त्र पोलीस दल, राज्य सशस्त्र पोलीस दल आणि जिल्हा पोलीस दलाच्या तुकड्या तैनात केल्या आहेत. मतमोजणी केंद्र आणि स्ट्राँग रुमवरल्या सुरक्षा व्यवस्थेवर पोलीस उपअधिक्षक देखरेख करतील.

हरियाणा विधानसभा निवडणुकीसाठी झालेल्या मतदानाची मतमोजणीही उद्या होणार आहे.

**<><><><><>**

भारत  आणि मालदिवचे संबंध जुने असून भारत हा मालदिवचा सगळ्यात जवळचा आणि घनिष्ट मित्रदेश आहे. भारताने सदैव मालदिवसाठी चांगल्या शेजाऱ्याची भूमिका निभावली आहे. या परस्पर सहकार्याला धोरणात्मक दिशा देण्यासाठी सर्वसमावेशक अशा आर्थिक आणि सागरी सुरक्षेला प्राधान्य देण्याचं आजच्या चर्चेत केलं, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्ली इथं केलं.

मालदिवचे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद मोईजू यांच्याबरोबर प्रतिनिधीमंडळ स्तरावर चर्चा झाल्यानंतर ते बोलत होते. यावेळी उभय देशांमध्ये अनेक सामंजस्य करार झाले. यात भारताच्या सहकार्यानं मालदीवमध्ये होणाऱ्या रुपे या भारतीय कार्डाची ओळख, हनिमादो विमानतळाची पुनर्बांधणी अशा विविध प्रकल्पांचा समावेश आहे.

मालदिवचे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद मोईजू भारताच्या दौऱ्यावर आले असून, आज त्यांचं नवी दिल्लीत राष्ट्रपती भवनात औपचारिक स्वागत करण्यात आलं.

**<><><><><>**

जमिनीच्या मोबदल्यात नोकरी या मनी लाँड्रिंग प्रकरणात राष्ट्रीय जनता दलाचे नेते आणि माजी रेल्वे मंत्री लालू प्रसाद यादव यांच्यासह तेजस्वी यादव आणि तेज प्रताप यादव यांना दिल्लीच्या राऊस एव्हेन्यू न्यायालयानं आज जामीन मंजूर केला. या प्रकरणी ईडीच्या अगोदर सीबीआयने गुन्हा दाखल केला होता.

ईडीने १८ सप्टेंबर रोजी आरोपपत्र दाखल केल्यानंतर न्यायालयाने लालू यादव आणि इतरांना समन्स बजावलं होतं. २००४ ते २००९ या काळात लालू प्रसाद यादव रेल्वे मंत्री असताना मध्य प्रदेशातल्या जबलपूर इथल्या रेल्वेच्या पश्चिम मध्य विभागातल्या नियुक्त्या या जमीनीच्या मोबदल्यात केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. याप्रकरणी पुढची सुनावणी २५ ऑक्टोबर रोजी होणार आहे.

<><><><><>

ऑलिंपिक क्रीडा स्पर्धांदरम्यान भारतीय क्रीडापटूंसाठी कांदिवलीचं साई क्रीडा संकुल एक महत्त्वाचं क्रीडा केंद्र बनेल, असं प्रतिपादन केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल यांनी काल केलं. उत्तर मुंबईतल्या विविध विकासकामांचं भूमिपूजन, उद्घाटन आणि लोकार्पण काल गोयल यांच्या हस्ते झालं त्यावेळी ते बोलत होते. या दौऱ्यात त्यांनी गोरेगाव इथल्या उद्यानाचं उद्घाटन केलं. त्यानंतर त्यांनी मालाड इथं मालवणीभ भागात बृहन्मुंबई महानगरपालिका शाळेच्या इमारतीचं लोकार्पण आणि कांदिवलीच्या शताब्दी रुग्णालयात अन्न वाटप केलं. कांदिवली इथं क्रीडा केंद्रासाठी महाराष्ट्र सरकार आणि भारतीय क्रीडा प्राधिकरण यांच्यात झालेल्या सामंजस्य करारावर गोयल यांनी स्वाक्षरी केली. यानंतर त्यांनी बोरिवली इथं कुलूपवाडी रस्त्याच्या कामाचं भूमिपूजन केलं आणि दहिसरच्या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या लाभार्थ्यांना सदनिकांच्या चाव्या सुपूर्द केल्या.

<><><><><>

हवाई दलाच्या वर्धापन दिनानिमित्त काल चेन्नईत विमानांची प्रात्यक्षिकं पहायला गेलेल्या ५ जणांचा उष्माघाताने मृत्यू झाला. तमिळनाडूचे आरोग्य आणि

कुटुम्बकल्याण मंत्री एम सुब्रमणियन यांनी आज चेन्नईत पत्रकारपरिषदेत ही माहिती दिली. प्रात्यक्षिकांच्या ठिकाणी ४० रुग्णवाहिकांची सुविधा आणि तातडीची वैद्यकीय मदत उपलब्ध असतानाही दुर्दैवाने ही दुर्घटना झाली असं ते म्हणाले. प्रेक्षकांनी उन्हापासून संरक्षणासाठी पुरेशी काळजी घ्यावी असं आवाहन करण्यात आलं होतं, असं त्यांनी सांगितलं.

या प्रात्यक्षिकांच्या वेळी व्यवस्थापनात ढिसाळपणा झाल्याची टीका माहिती आणि प्रसारण मंत्री एल मुरुगन यांनी केली आहे. तिरुनेलवेल्ली इथं ते वार्ताहरांशी बोलत होते. द्रमुक सरकारला या कार्यक्रमाचं आयोजन करता आलं नाही असं ते म्हणाले. या सरकारच्या काळात तमिळनाडूमधे अमली पदार्थांची तस्करी वाढली आहे असा आरोपही त्यांनी केला.

<><><><><>

पाकिस्तानात काल रात्री कराची विमानतळाबाहेर झालेल्या स्फोटात दोन जण ठार तर अनेक जण जखमी झाले. बलुच लिबरेशन आर्मी या फुटीरतावादी दहशतवादी संघटनेनं या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली असून त्यांनी चीनच्या गुंतवणुकदारांच्या ताफ्याला लक्ष्य केल्याचं संघटनेनं म्हटलं आहे.

<><><><><>

सोंघे सिंगापूर खुल्या बिलियर्ड्स स्पर्धेत भारताच्या पंकज अडवाणीने काल सिंगापूरच्या जेडेन ओंग याला ५-१ ने नमवत विजेतेपद पटकावलं. यानंतर आता पंकज येत्या नोव्हेंबर महिन्यात दोहा इथं होणाऱ्या बिलियर्ड्सच्या जागतिक विजेतेपदाच्या स्पर्धेत सहभागी होत आहे.

**<><><><><>**

अंमली पदार्थ विरोधी पथक आणि गुजरात एटीएस यांच्या संयुक्त पथकानं मध्य प्रदेशात भोपाळ इथून अठराशे कोटीं रुपयांपेक्षा अधिक किमतीचे अमली पदार्थ जप्त केले आहेत. या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे. भोपाळजवळच्या बागरोडा गावातल्या एका कारखान्यातून हे अमली पदार्थ जप्त केले आहेत. गुजरातचे गृहराज्यमंत्री हर्ष सिंघवी यांनी या वृत्ताला दुजोरा दिला आहे.